## निशाण क्र. १०९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील वादी यांना वैद्यकीय तज्ञांनी दिलेले प्रमाणपत्र न्यायालयात सादर करावयाचे आहे. वादीला याकामी वैद्यकीय तज्ञांना तपासावयाचे असून वादीने त्या संबंधीत डॉक्टरना साक्षीदसमन्स काढण्याचा अर्ज देखील दिला आहे. सबब वादीला पुढील पुराव्याचे दृष्टीने सदरचे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळावी, अशी प्रस्तूत वादी याने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ने सदर अर्जावर नि. क्र. ११२ ला म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून सदर अर्जामध्ये वादीने केलेली कोणतीही मागणी मान्य होण्याजोगी नाही. वादीने आपल्या दाव्यात व सरतपासाचे शपथपत्रामध्ये कोठेही प्रस्तूत अर्जामधील वैद्यकीय प्रमाणपत्राचा उल्लेख केलेला नाही. दि.प्र.सं.ऑर्डर ७ रूल १४ प्रमाणे वादीने दावा दाखल करताना ज्या कागदपत्रांआधारे दावा दाखल केलेला आहे. ती सर्व कागदपत्रे यादीसहीत दाव्यासोबत हजर करणेची आहेत. तसेच त्यापुढे ऑर्डर १३ रूल १(१) नुसार वादी यांनी न्यायालयाने मुद्दे निश्चित करणेपूर्वी मूळ कागदपत्रे हजर करणेची आहेत. सदर नियमांच्या अनुषंगाने वादी यांनी नि. क्र. १०९ च्या अर्जासोबत दिलेला कागद हजर केलेला नाही. वादी यांचा उलटतपास यापूर्वीच पूर्ण झालेला असून वादी याने प्रस्तूतचा दावा दि. ०३/०४/२०१३ रोजी दाखल केला असून नि. क्र. ५३ वर न्यायालयाने मुद्दे काढले आहेत. वादी हजर करत असलेला कागद त्यावरील तारखेनुसार वादीकडे दि. २४/०६/२०१३ पासून ताब्यात असलेला दिसून येतो. वादी यांनी आपल्या आर्जमध्ये कुठेही तथाकथित वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यास वादीस झालेल्या विलंबाचे कोणतेही संयुक्तीक

कारण दिलेले नाही. तसेच सदर कागद आजअखेर कायद्यानुसार हजर करून घेता येणारा नाही. सबब प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादीने केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. प्रतिवादी तर्फे सादर करण्यात आलेल्या **मि. लॉरेन्स ख्रिस्तोफर फर्नांडीस वि. मिसेस. मीना जुदीथ पिंटो इ तावोरा २०१७ एस.टी.पी.एल. ७७१३ बॉम्बे** या न्यायनिवाडयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी सदर केसमध्ये कागदपत्र दाखल करण्याचा अर्ज मंजूर करून झालेल्या विलंबाबात खर्चाची रक्कम रू. ५०००/— देण्यात यावी असा आदेश पारीत केला आहे. सबब, या न्यायतत्वानुसार प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते.

५. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १३ नियम १ उपनियम ३ नुसार वादमुद्दे निश्चित केल्यानंतर असे कागदपत्र दाखल करता येतात. प्रस्तुत वादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे क्रमप्राप्त आहे असे वाटते. परंतू वादीने सदरचे कागदपत्र दाखल करण्यास निश्चित विलंब केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्याबाबतचा खर्च वादी देण्यास बंधनकारक आहे. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे :

# **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी याने रूपये १००/– खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्याने रूपये ५०/– प्रतिवादीस दयावेत व उर्वरित रक्कम विधी सेवा समिती सिंधुदुर्गला जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ०५/०८/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Balkrishna Rajaram Patil

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.08.06 12:54:13 +0530